**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## उन्हाळी २०२० परीक्षेकरीता सर्व माजी विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज सादर करण्याबाबत सूचना

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने उन्हाळी २०२० परीक्षेकरीता अंतीम वर्ष / अंतीम सत्र व याच विद्यार्थ्यांचे इतर सत्रांचे अनुशेष वगळून इतर सर्व माजी विद्यार्थ्यांच्या परीक्षा तसेच एम.फिल. (माजी विद्यार्थी) परीक्षा घेण्यात येणार असून ज्या विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे सादर केले नसतील, त्यांना आपल्या महाविद्यालयामध्ये तातडीने परीक्षा आवेदनपत्रे मुळ शुल्कासह सादर करावयाचे आहे. तरी सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

या संदर्भात विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने विद्यापीठाशी संलग्नित सर्व संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य, मानद संचालक व विभागप्रमुख यांना पत्र पाठवून परीक्षा प्रक्रियेचा कालावधी, प्रात्याक्षिक, प्रकल्प व मौखिक परीक्षेबाबत कार्यपद्धती, परीक्षा पद्धती, एम.फिल. परीक्षेकरीता पात्र असलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा, परीक्षा आवेदनपत्रे स्वीकारणे व परीक्षा क्रमांक देण्याची पद्धती, परीक्षेची कार्यपद्धती, मूल्यांकन व गुणदानाची कार्यपद्धती, परीक्षांचे निकाल जाहीर करण्याबाबतची कार्यपद्धती, याशिवाय विद्यार्थ्यांची सुरक्षाव आरोग्यहित लक्षात घेवून करावयाची कार्यवाही, परीक्षा केंद्रांना आपल्या स्तरावर ऑफलाईन परीक्षांच्या संचालनाकरीता खर्च निर्देश क्रमांक २०/२०२० नुसार करावयाची कार्यवाही, याबाबतची सविस्तर माहिती पत्र पाठवून कळविली आहे. तरी सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख यांनी केले आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. १४/१२/२०२०.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी